RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014–16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक १३(९)] बुधवार, जून २५, २०१४/आषाढ ४, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**—महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १ ते ३ |

दिनांक २४ जून २०१४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

(माननीय राज्यपालांनी संमिती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २५ जून २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०१४ चा महा. ८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ (यात, यापुढे, ज्याच्या निर्देश, " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— २०१४ चा महा. ८.

(क) खंड (१३) च्या उप-खंड ( ञ) मध्ये, " तीन हजार " या मजकुराऐवजी " तीन लाख " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) खंड (१९) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (१९) " मान्यताप्राप्त भाषा " याचा अर्थ, मराठी, गुजराती, हिंदी किंवा शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतीही भाषा, असा आहे ; ".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मधील पहिल्या परंतुकामध्ये " विचार विनिमय करून नंतर " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल, त्या त्या ठिकाणी, त्या मजकुराऐवजी " शिफारशीनंतर " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामपंचायतस्तरावर अशी नोंदवही ठेवण्यात येईल. ".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " १०० रुपये, यापैकी जी रक्कम अधिक असेल " या मजकुराऐवजी, " पन्नास हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ च्या पोट-कलम (१) मधील " शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल " या मजकुराऐवजी " पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील " कलम १४ च्या प्रयोजनांकरिता " या मजकुराऐवजी " कलमे १४ व १८ च्या प्रयोजनांकरिता " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये " पाच वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी " पंधरा वर्षांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मधील, " प्रत्यक्ष रक्कम नमूद केलेली नसेल " या मजकुराऐवजी " प्रत्यक्ष रक्कम व व्याजाचा दर नमूद केलेला नसेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २३ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम (१) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

" परंतु, अनुसूचित क्षेत्रांमध्ये सावकाराने आकारावयाचा व्याजाचा दर ग्रामसभेमार्फत निश्चित करण्यात येईल, जो शासनाने या पोट-कलमाअन्वये निश्चित केलेल्या कमाल व्याज दरापेक्षा अधिक असणार नाही. ".

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

" परंतु, जी व्यक्ती, कर्जदाराच्या घरी अथवा ठिकाणी, केवळ माहिती मिळविण्यासाठी किंवा ती देण्यासाठी जाईल त्यास या कलमाच्या प्रयोजनार्थ उपद्रव असे मानण्यात येणार नाही.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.